# गुन्हे शाखा युनिट ३ ने, पहिल्या पतीची मोटार सायकल चोरणारे महिलेला तीचे दुसरे पतीसह घेतले ताब्यात

---

श्री हरीषकुमार किशनचंद बोधवानी वय ३९ वर्षे ,धंदा- व्यवसाय रा. ए-२/२ विक्रांत कॉम्पलेक्स पिंपरी पुणे यांची सुझूकी ॲक्सेस मोपेड नंबर **MH-14/GP2928** ही दिनांक २८/०४/२०१८ रोजीचे पुर्वी बिल्डींगचे पार्किंगमधून चोरीस गेल्याने त्यांनी अज्ञात चोरटया विरुध्द पिंपरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने पिंपरी पो.स्टे गु.र.नं. २८९/२०१८ भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे तक्रार दाखल आहे.

गुन्हे शाखा युनिट-३, चे पथक वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेन्द्र मोकाशी यांचे मार्गदर्शना खाली वाहन चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करणेकरीता खाजगी वाहनांवरुन पेट्रोलींग फिरत असताना एक पांढरे रंगाची सुझूकी मोपेड **MH-12/VS 5841** ही भाऊ पाटील रोड बोपोडी पुणे रोडने जात असताना पोलीस नाईक ८३६ अतुल साठे यांना मोपेड वरिल नंबरचे बाबत संशय आल्याने स्टाफचे मदतीने मोपेड वरिल स्वारांना थांबवून त्यांचेकडे चौकशी करता मोपेड चालकाने त्याचे नाव अमित सुनिल कागडा वय २३ वर्षे रा.बौध्दनगर ब्लॉक नं.३ रिव्हर रोड पिंपरी पुणे असे सांगून पाठीमागे बसलेली महिला त्याची पत्नी दिशा अमित कागडा वय २३ वर्षे रा.सदर असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे ड्रायव्हींग लायसेन्स तसेच मोपेडचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी कागदपत्रे जवळ नसल्याचे सांगितले.वरिल दोघे पती पत्नी हे देत असलेल्या माहिती बाबत संशय आल्याने त्यांना ताब्यात घेऊन गुन्हे शाखा युनिट-३, चे कार्यालयात आणून स्टोलन व्हेईकल ॲपव्दारे माहिती घेतली असता पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे वाहन चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे व मोपेडचा मुळ नंबर **MH-14/GP2928** असा असलेबाबत माहिती प्राप्त झाली.

त्यामाहितीच्या आधारे त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता त्या महिलेने, माझे पहिले पती मला मारहाण करुन त्रास दयायचे. त्यांचे त्रासाला कंटाळून मी त्यांना सोडून सुमारे २ वर्षापासून अमित सुनिल कागडा यांचेशी लग्न करुन रहात आहे. माझे व पतींचे भांडण झाल्यानंतर मी गाडी घेऊन आले होते पोलीसांनी आम्हाला पकडू नये म्हणून ॲक्सेस गाडीवर **MH-12/VS 5841** असा नंबर टाकून वापरत होते असे सांगितल्याने पहिल्या पतीची मोटार सायकल चोरणारी महिला व तीचे दुसरे पतीला त्यांचे ताब्यात मिळून आलेल्या किंमत रुपये ३५,०००/- रु.चे मोपेडसह पुढील कार्यवाही करीता पिंपरी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड आयुक्ताल यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त श्री,अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा -१ श्री.समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, पोलीस स्टाफ दत्तात्रय गरुड,संतोष क्षिरसागर, गजानन गाणबोटे, मच्छिंद्र वाळके, अतुल साठे, म.पो.शि.५२९१ काळे यांच्या पथकाने केली आहे.